**RNI No. MAHBIL /2009/31732**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

**वर्ष ८, अंक ७]** **गुरुवार ते बुधवार, मार्च ३-९, २०२२/ फाल्गुन १२-१८, शके १९४३** **[पृष्ठे १७ , किंमत : रुपये ९.००**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ फेब्रुवारी २०२२

**अधिसूचना**

**ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९.**

क्रमांक ग्रासंअ-२०२०/प्र.क्र.५३/ग्रासं-४.— ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ (२०१९ चा ३५) याचे कलम १०२ चे पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चे खंड (ञ), (ट), (ण) आणि (थ) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीतील ग्राहक संरक्षण (राज्य आयोग आणि जिल्हा मंच यांचे अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती, वेतन, भत्ते व सेवेच्या शर्ती) नियम, २०१९ हे जेथवर या नियमामध्ये समाविष्ट असलेल्या बाबींशी संबंधित असतील तेथवर त्यांचे अधिक्रमण करून, अशा अधिक्रमणापूर्वी केलेल्या किंवा वगळलेल्या गोष्टींखेरीज,याद्वारे महाराष्ट्र शासन, पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव**- या नियमांस महाराष्ट्र ग्राहक संरक्षण (ग्राहक तक्रार निवारण आयोग) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. **व्याख्या**- (१) या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर—

(क) 'अधिनियम ' याचा अर्थ, ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ (२०१९ चा ३५) असा आहे ;

(ख) 'अपिलकर्ता ' याचा अर्थ, जिल्हा आयोग किंवा यथास्थिति राज्य आयोग यांच्या आदेशांविरूद्ध अपिल करणारी व्यक्ती असा आहे ;

(ग) 'प्राधिकृत प्रतिनिधी ' याचा अर्थ, राज्य आयोग किंवा जिल्हा आयोग यथास्थिति यांच्या समोर पक्षकाराच्या वतीने अपिल किंवा प्रतिवाद दाखल करण्यासाठी अशा पक्षकाराने प्राधिकृत केलेली व्यक्ती, असा आहे ;

(घ) 'आयोग ' याचा अर्थ, जिल्हा आयोग किंवा यथास्थिति राज्य आयोग, असा आहे ;

(ङ) ' ग्राहक कल्याण निधी ' याचा अर्थ केंद्रिय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १२) या कलम ५७ अंतर्गत राज्य शासनाने स्थापित केलेला ग्राहक कल्याण निधी, असा आहे ;

(च) ' ज्ञापन ' याचा अर्थ अपिलकर्त्याने दाखल केलेले अपिलाचे ज्ञापन, असा आहे ;

(छ) 'राष्ट्रीयीकृत बँक' याचा अर्थ बँकींग कंपनीज (उपक्रमाचे संपादन आणि बदल) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) च्या पहिल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली नवीन बँक किंवा बँकींग कंपनीज (उपक्रमाचे संपादन आणि बदल) अधिनियम, १९८० (१९८० चा ४०) च्या पहिल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली नवीन बँक, असा आहे ;

(ज) ' विरोधी पक्षकार ' याचा अर्थ अधिनियमांतर्गत केलेल्या तक्रारीला उत्तर देणारी व्यक्ती, असा आहे ;

(झ) 'अध्यक्ष' याचा अर्थ राज्य आयोगाचा अध्यक्ष किंवा यथास्थिति जिल्हा आयोगाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ञ) ' प्रतिवादी ' याचा अर्थ अपिलाच्या कोणत्याही ज्ञापनास उत्तर देणारी व्यक्ती, असा आहे ;

(ट) ' कलम ' याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(२) या नियमांमध्ये वापरलेल्या परंतु यात, यावर व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना अधिनियमामध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.

**३. जिल्हा आयोग व राज्य आयोग यांचे कार्यालय :—**

(१) जिल्हा आयोगाचे कार्यालय संबंधित जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी स्थित असेल.

(२) राज्य आयोगाचे कार्यालय खालील ठिकाणी असेल —

(अ) मुंबई आणि उक्त अधिनियमाच्या कलम ४२ च्या पोट -कलम (२) अन्वये राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या ठिकाणी;

(ब) औरंगाबाद आणि नागपूर येथे प्रादेशिक खंडपीठ असेल.

**४. जिल्हा आयोग व राज्य आयोगाच्या कामकाजाचे दिवस व कार्यालयीन वेळ.—** जिल्हा आयोग व राज्य आयोगाच्या कामकाजाचे दिवस व कार्यालयीन वेळ हे राज्य शासनाचे कामकाजाचे दिवस व कार्यालयीन वेळ यांच्या प्रमाणेच असतील.

**५. मोहोर आणि चिन्ह.—** राज्य आयोग अणि जिल्हा आयोगाची अधिकृत मोहोर व चिन्ह हे, राज्य शासन, विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

**६. आयोगाची बैठक.—** आयोगाचे अध्यक्ष जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा आयोगाची बैठक बोलावील.

**७. राज्य आयोग आणि जिल्हा आयोगासमक्ष ग्राहक तक्रार दाखल करण्याची आणि सुनावणीची कार्यपद्धती.—**

(१) **आयोगाची भाषा.—** तक्रारदारास एकतर मराठी किंवा हिंदी किंवा इंग्लिश मध्ये तक्रार दाखल करता येईल. परंतु जिल्हा आयोगाची भाषा ही मराठी असेल आणि राज्य आयोगाची भाषा इंग्लिश असेल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ भाषा यात सुनावणीच्या व आदेशाच्या भाषेचा समावेश होतो.

(२) तक्रारदाराला व्यक्तिशः किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीद्वारे किंवा नोंदणीकृत टपालाद्वारे आयोगाच्या नावे चार प्रतीमध्ये पुढील तपशील असलेली लेखी तक्रार दाखल करता येईल.—

(क) तक्रारदाराचे नाव, वर्णन आणि पत्ता.—

(ख) विरोधी पक्षकार किंवा यथास्थिति पक्षकारांचे नाव, वर्णन आणि पत्ता, ज्यायोगे विरोधी पक्षकार निश्चित केले जातील.

(ग) तक्रारीच्या संदर्भातील सत्यता आणि केव्हा आणि कुठे तक्रार उद्भवली.

(घ) तक्रारीत केलेल्या आरोपांच्या पुष्टीसाठीचे दस्तऐवज.

(ङ) तक्रारदार दावा करीत असलेला अनुतोष.

(३) पोट-नियम (२) अन्वये सादर करण्यात आलेली प्रत्येक तक्रार ही नियम ९ मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या शुल्कासह सादर करण्यात येईल.

(४) आयोग, त्यांच्याकडे दाखल असलेली तक्रार निकाली काढतांना, कलम (३७) आणि (३८) अन्वये तरतूद केलेल्या कार्यपद्धती व शर्तीचे पालन आयोगाला आवश्यक वाटेल अशा फेरबदलांसह करेल.

(५) प्रतिवादी किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी त्यांचा प्रतिवाद आणि दस्तऐवज चार प्रतीत देतील.

(६) सुनावणीच्या दिनांकास किंवा सुनावणी तहकूब केलेल्या इतर अन्य दिनांकास पक्षकार किंवा त्यांचा प्राधिकृत प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित असतील आणि जेथे.—

(क) तक्रारदार किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहण्यास कसूर करतील तेथे आयोग त्याच्या स्वविवेकानुसार तक्रारीतील अभावामुळे तक्रार एकतर बेदखल करेल किंवा गुणावगुणाच्या आधारावर निर्णय घेईल.

(ख) प्रतिवादी किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहण्यास कसूर करील तर प्रकरणाच्या गुणावगुणावर आयोग तक्रारीबाबत एकतर्फी निर्णय घेईल.

(७) जिल्हा आयोग किंवा यथास्थिति राज्य आयोग त्याला योग्य वाटेल अशा अटींच्या आधारावर आणि कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर तक्रारींची सुनावणी तहकूब करु शकेल, तथापि, शक्य तोवर तक्रारीवर खालील कालावधी दरम्यान निर्णय घेण्यात येईल.

(क) अशा तक्रारी ज्यामध्ये वस्तूच्या विश्लेषण किंवा तपासणीची आवश्यकता नसेल, अशी तक्रार विरोधी पक्षकाराला नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत.

(ख) अशा तक्रारी ज्यामध्ये विश्लेषण किंवा तपासणीची आवश्यकता आहे, त्यामध्ये प्रतिवाद्यास नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पाच महिन्याच्या आत.

(८) पोट-नियम (७) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीनंतर तक्रार निकाली काढण्यात येत असल्यास आयोग अशा विलंबाची कारणे लेखी नमूद करेल.

(९) कार्यवाही केल्यानंतर, तक्रारीमध्ये नमूद केलेल्या दोषारोपाबाबत आयोगाची खात्री पटली असेल तर, आयोग विरोधी पक्षकार किंवा यथास्थिति, पक्षकारांना कलम (३९) च्या पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या एक किंवा अनेक कृती करण्यास आदेश देऊ शकेल.

(१०) आयोगास त्यांच्याकडून देण्यात आलेले आदेश, ज्यामध्ये कलम ४१ आणि ५१ अंतर्गत अपिल करण्यास प्राधान्य दिले नसेल, आयोगाच्या संकेतस्थळावर किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे उपलब्ध करण्याबाबत निर्देश देण्याचे देखील अधिकार असतील आणि अशा प्रकाशनासाठी आयोग किंवा कोणत्याही माध्यमाविरुद्ध कोणतीही कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

८. **इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तक्रार दाखल करण्याची पद्धत.—** राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्षांनी अधिसूचित केलेल्या दिनांकापासून आणि अधिसूचित केलेल्या प्रकरणांच्या प्रकारांतर्गत आयोगामध्ये इलेक्ट्रॉनिक पध्दतीने तक्रार दाखल करता येईल.

९. **तक्रार दाखल करताना अदा करावयाचे शुल्क.—**

(१)अधिनियमाच्या कलम ३५ च्या पोट- कलम (१) किंवा कलम ४७ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) च्या पोट-खंड (१) व (२) अंतर्गत दाखल करण्यात आलेली प्रत्येक तक्रार ही कलम ३५ च्या पोट-कलम (२) अंतर्गत केंद्र सरकारने सुनिश्चित केल्यानुसार खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या शुल्कासह दाखल करता येईल. सदर शुल्क अध्यक्ष, जिल्हा आयोग किंवा यथास्थिति प्रबंधक, राज्य आयोग, यांच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या रेखित धनाकर्षाद्वारे किंवा रेखित भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे संबंधित जिल्हा आयोग किंवा राज्य आयोग असलेल्या ठिकाणी देय करता येईल किंवा संबंधित आयोगाने केलेल्या व्यवस्थेनुसार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अदा करता येईल.

(२) आयोग, उपरोक्त पोट- नियम (१) अन्वये आयोगाकडे जमा झालेले शुल्क राज्य शासनाच्या समुचित लेख्यामध्ये जमा करील.

**तक्ता**

| अ.क्र. (१) | वस्तू किंवा सेवा याच्यासाठी अदा केलेले मूल्य (२) | शुल्क रक्कम (रुपयांत) (३) |
|---|---|---|
| | **जिल्हा आयोग** | |
| १ | रुपये पाच लाखापर्यंत | निरंक |
| २ | रुपये पाच लाखापेक्षा अधिक आणि रुपये दहा लाखापर्यंत | रु. २०० |
| ३ | रुपये दहा लाखापेक्षा अधिक आणि रुपये वीस लाखापर्यंत | रु. ४०० |

**तक्ता**

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ४ | रुपये वीस लाखापेक्षा अधिक आणि रुपये पन्नास लाखापर्यंत | रु. १००० |
| ५ | रुपये पन्नास लाखापेक्षा अधिक आणि रुपये एक कोटी लाखापर्यंत | रु. २००० |
| | **राज्य आयोग** | |
| ६ | रुपये एक कोटी पेक्षा अधिक आणि रुपये दोन कोटी पर्यंत | रु. २५०० |
| ७ | रुपये दोन कोटी पेक्षा अधिक आणि रुपये चार कोटी पर्यंत | रु. ३००० |
| ८ | रुपये चार कोटी पेक्षा अधिक आणि रुपये सहा कोटी पर्यंत | रु. ४००० |
| ९ | रुपये सहा कोटी पेक्षा अधिक आणि रुपये आठ कोटी पर्यंत | रु. ५००० |
| १० | रुपये आठ कोटी पेक्षा अधिक आणि रुपये दहा कोटी पर्यंत | रु. ६००० |

**१०. मालांचे विश्लेषण आणि परीक्षण करण्यासाठी आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती.—**

(१) मालाच्या चाचणी किंवा विश्लेषणासाठी घट्ट झाकण बसणाऱ्या स्वच्छ अशा पात्रामध्ये मालाचे एकापेक्षा अधिक नमुने पुरविण्याचे निदेश आयोगाला तक्रारदारास देता येईल.

(२) मालाचे नमुने प्राप्त झाल्यावर, आयोग त्या पात्रावर मोहोर लावील आणि पात्रावर पुढील माहिती असणाऱ्या खुणचिठ्ठया लावील :—

(क) ज्या प्रयोगशाळेकडे विश्लेषण व चाचणी करण्यासाठी नमूना पाठविण्यात येईल अशा समुचित प्रयोगशाळेचे नाव व पत्ता,

(ख) आयोगाचे नाव व पत्ता :

(ग) प्रकरण क्रमांक ; आणि

(घ) आयोगाची अधिकृत मोहोर

(३) आयोगाकडून मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडे मोहोरबंद नमुना पाठविण्यात येईल.

(४) मान्यताप्राप्त प्रयोगशाळा मोहोरबंद नमूना प्राप्त झाल्यानंतर आणि त्याचे परीक्षण केल्यानंतर अभिकथित दोषाचे स्वरुप व अहवाल सादर करण्याचा दिनांक विनिर्दिष्ट करणारा आपला अहवाल पंचेचाळीस दिवसांच्या आत किंवा आयोगाकडून देण्यात येईल अशा वाढीव कालावधीच्या आत आयोगाकडे पाठवील.

**११. राज्य आयोगासमोर अपील दाखल करणे व अपिलाच्या सुनावणीची कार्यपद्धती :—**

(१) अपिलकर्त्याकडून किंवा त्याच्या प्राधिकृत प्रतिनिधीकडून ज्ञापन आयोगाला व्यक्तिशः किंवा आयोगाला उद्देशून नोंदणीकृत डाकेने सादर करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१)अन्वये दाखल केलेले प्रत्येक अपील अर्ज शक्यतो टंकलिखीत स्वरुपात वा सुवाच्च हस्ताक्षरात दाखल केले जाईल आणि कोणत्याही युक्तिवादाशिवाय किंवा कथनाशिवाय अपिलाची कारणे त्या सुस्पष्ट शीर्षांतर्गत संक्षिप्तपणे मांडण्यात येतील आणि अशा कारणांना लागोपाठचा क्रम लावण्यात येईल.

(३) प्रत्येक अपील अर्जासोबत ज्याविरुद्ध अपील करण्यात आले आहे अशा, जिल्हा आयोगाच्या आदेशाच्या प्रमाणित प्रती आणि ज्ञापनामध्ये नमूद केलेल्या आक्षेपाच्या कारणांना पुष्टी देण्याकरिता आवश्यक असतील असे दस्तऐवज जोडण्यात येतील.

(४) अधिनियमाच्या कलम ४१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतमर्यादेच्या समाप्तीनंतर अपील दाखल केलेले असेल तर, त्या मुदतमर्यादेच्या आत अपील दाखल न करण्यासाठी अपिलकर्त्याकडे पुरेसे कारण होते याबद्दल राज्य आयोगाची खात्री पटवण्याकरिता त्याने ज्या वस्तुस्थितीचा त्याने आधार घेतला असेल, ती वस्तुस्थिती मांडलेले शपथपत्र पुष्टीदाखल जोडलेला अपील अर्ज सोबत जोडण्यात येईल.

(५) अपिलकर्ता, कार्यालयीन प्रयोजनांसाठी राज्य आयोगाला अपील अर्जाच्या चार प्रती सादर करील.

(६) पक्षकारांनी किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधींनी, सुनावणीच्या दिनांकास किंवा सुनावणी स्थगित केली असेल अशा इतर कोणत्याही दिनांकास राज्य आयोगासमोर उपस्थित राहणे त्यांना बंधनकारक असेल. राज्य आयोगास—

(अ) जर अपीलकर्ता किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी अशा दिनांकास उपस्थित राहण्यास कसूर करील तर, स्वाधिकारे एकतर अपील खारीज करता येईल किंवा प्रकरणाच्या गुणावगुणांवरुन निर्णय देता येईल.

(ब) जर प्रतिवादी किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी अशा दिनांकास उपस्थित राहण्यात कसूर करील तर, त्याबाबतीत राज्य आयोग, एकतर्फी कार्यवाही करील, आणि प्रकरणाच्या गुणावगुणांवरुन ह्या अपिलावर एकतर्फी निर्णय करील.

(७) अपीलकर्त्यास, राज्य आयोगाची परवानगी घेतल्याखेरीज अपील अर्जात नमूद केलेल्या हरकतींच्या कोणत्याही कारणाच्या पुष्ट्यर्थ प्रतिपादन करता येणार नाही किंवा त्याची सुनावणी करता येणार नाही. परंतु राज्य आयोग त्या अपिलावर निर्णय करताना, त्या अपील अर्जात नमूद केलेल्या किंवा या नियमान्वये राज्य आयोगाची परवानगी घेतलेल्या हरकतींच्या कारणांवरच खिळून राहणार नाही. परंतु ज्या कोणत्याही इतर कारणावरुन एखादया पक्षकारावर बाधक परिणाम होईल, त्या पक्षकाराला, राज्य आयोगाकडून त्याचे म्हणणे मांडण्याची किमान एक संधी देण्यात आल्याखेरीज, आयोग अशा कोणत्याही कारणावर आधारित आपला निर्णय देणार नाही.

(८) राज्य आयोगास, त्याला योग्य वाटेल अशा अटींवर आणि कोणत्याही टप्प्यावर जर वाजवी कारण असेल तर त्या अपिलावरील सुनावणी स्थगित करता येईल. सर्वसाधारणपणे एकापेक्षा अधिक वेळा अशी सुनावणी स्थगित करता येणार नाही, आणि त्या अपिलावर शक्य तोवर, सुनावणीच्या पहिल्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत निर्णय घेण्यात येईल. पहिल्या परंतुकामध्ये स्पष्ट करण्यांत आलेल्या कालावधी दरम्यान अपील निकाली न काढल्यास अपील निकाली काढतेवेळी याबाबतची कारणे राज्य आयोग लेखी नमूद करेल.

(९) अपिलावरील राज्य आयोगाच्या आदेशांवर त्यामध्ये, राज्य आयोगाच्या न्यायपीठाच्या सदस्यांकडून दिनांकित स्वाक्षरी करण्यात येईल आणि ते पक्षकारांना विनामूल्य पुरविण्यात येतील.

१२. **राज्य आयोगासमोर रक्कम भरणा करण्याची पद्धत.—** कलम ४१ अंतर्गत जेव्हा अपील दाखल केले जाईल, तेव्हा सदर कलमाच्या दुसऱ्या परंतुकामधील तरतुदीनुसार अपिलकर्ता रकमेचा भरणा प्रबंधक, राज्य आयोग, मुंबई यांना मुंबई येथे देय असलेल्या किंवा प्रबंधक, राज्य आयोगाचे प्रादेशिक खंडपीठ, औरंगाबाद किंवा प्रबंधक, राज्य आयोगाचे प्रादेशिक खंडपीठ, नागपूर याच्या नावे अनुक्रमे औरंगाबाद आणि नागपूर येथे देय असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेवर काढलेल्या रेखित दर्शनी धनाकर्षाद्वारे करेल.

१३. **आयोगाचे अतिरिक्त अधिकार :—**

(१) आयोगाला कोणत्याही व्यक्तीस —

(क) आयोगासमोर चालू असलेल्या प्रकरणाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास एखाद्या व्यक्तिच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या नोंदवही, लेखा, कागदपत्रे किंवा वस्तू आयोगासमोर सादर करण्यास आणि त्याची तपासणी करण्यास आणि आयोगाच्या वतीने आयोगाच्या अधिकाऱ्याकडे ठेवण्यास.

(ख) आयोगासमोर चालू असलेल्या प्रकरणाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास खंड (क) मधील निर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडे माहिती सादर करण्यास, फर्मावण्याचा अधिकार असेल.

(२) अधिनियमाअंतर्गत कोणत्याही कार्यवाही दरम्यान, आयोगासमोरच्या कार्यवाहीमध्ये सादर करणे आवश्यक असलेले कोणतेही पुस्तक, कागद, वस्तू किंवा दस्तऐवज नष्ट केले जात आहे किंवा नष्ट केले जाऊ शकते, बदलले जाऊ शकते, खोटे केले जाऊ शकते किंवा लपविले जाऊ शकते, तेव्हा आयोगास सकारण वाटत असेल तर आयोगास, लेखी आदेशाने, कोणत्याही अधिकाऱ्याला कोणत्याही परिसरात प्रवेश करण्याचा आणि शोध घेण्याचा अधिकार वापरण्यास प्राधिकृत करता येईल आणि अशा कार्यवाहीच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेले कोणतेही पुस्तक, कागद, दस्तऐवज किंवा वस्तू जप्त करता येईल :

परंतु अशी जप्ती केल्यानंतर लगेच किंवा; अशा जप्ती केल्यानंतर बहात्तर तासांच्या लेखी कारणे विनिर्दिष्ट करून अशा जप्तीबाबत राज्य आयोगास किंवा यथास्थिति, जिल्हा आयोगास कळविण्यात येईल.

(३) राज्य आयोगास किंवा यथास्थिति, जिल्हा आयोगास अशा जप्त केलेल्या कागदपत्रांची किंवा वस्तुंची तपासणी केल्यावर, ते रोखून ठेवण्याचे किंवा संबंधित पक्षाला ते परत करण्याचे आदेश देता येतील.

१४. **सहजगत्या ओळखता न येणाऱ्या ग्राहकांच्या नुकसान किंवा इजा यासाठी देय असलेली रक्कम जमा करणे :—**

(१) कलम ३९ च्या पोट- कलम (१) च्या खंड (क) अंतर्गत जेव्हा जिल्हा आयोगाकडून किंवा राज्य आयोगास कलम ४९ च्या पोट- कलम (१) अंतर्गत असलेल्या अधिकारांतर्गत राज्य आयोगाकडून आदेश पारित केले जातील, ज्यामध्ये विरोधी पक्षकारास

सहजगत्या ओळखता न येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील ग्राहकांना झालेले नुकसान किंवा इजा यामुळे ठराविक रक्कम अदा करण्याचे आदेश दिले असतील, अशी रक्कम राज्य शासनाने स्थापित केलेल्या ग्राहक कल्याण निधीमध्ये आयोगाकडून जमा केली जाईल.

(२) राज्य शासनाच्या ग्राहक कल्याण निधीमध्ये पोट- नियम (१) अंतर्गत जमा झालेली रक्कम ही महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महाराष्ट्र ४३) अंतर्गत केलेल्या नियमानुसार उपयोगात आणली जाईल.

**१५. राज्य आयोगाने माहिती सादर करणे.—** वित्तीय वर्षाच्या तिमाही कालावधीसाठीची माहिती, राज्य आयोग राज्य शासनास या नियमांसोबत जोडलेल्या अनुसूची १ मध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये सादर करील.

**अनुसूची-१**

**(नियम १५ पहा)**

**अंमलबजावणीची सद्य:स्थिती**

**(तिमाही कामगिरी अहवाल)**

**ग्राहक आयोगाचे कामकाज/ग्राहक संरक्षण उपाययोजना**

**राज्याचे नाव :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. राज्य आयोग व जिल्हा आयोग आस्थापना | | | | | |
| (एक) | राज्यातील एकूण जिल्ह्यांची संख्या | | | | |
| (दोन) | राज्यातील जिल्हा आयोगांची संख्या | | | | |
| | (क) एकूण स्थापित : | | | | |
| | (ख) कार्यरत : | | | | |
| | (ग) अकार्यरत : | | | | |
| | (घ) जिल्हा आयोग अद्याप स्थापित नसलेल्या जिल्ह्याचे नाव : | | | | |
| | जिल्हा आयोग अद्याप स्थापित नसलेल्या जिल्ह्यांची संख्या : | | | | |
| | (ङ) एकापेक्षा अधिक जिल्हा आयोग स्थापित असलेल्या जिल्ह्यांची संख्या | जिल्ह्याचे नाव | | जिल्हा आयोगांची संख्या | |
| (तीन) | राज्य आयोग कार्यरत आहे अथवा कसे | | | होय | नाही |
| (चार) | एकूण मंजूर व रिक्त पदे | राज्य आयोग | | जिल्हा आयोग (जिल्हा आयोग निहाय स्वतंत्र माहिती जोडावी) | |
| | | मंजूर | रिक्त | मंजूर | रिक्त |
| | (अ) अध्यक्ष | | | | |
| | (ब) सदस्य | | | | |
| | (क) पद रिक्त असल्याची कारणे आणि पदभरतीसाठी | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | केलेली कार्यवाही (स्वतंत्रपणे जोडावे) | | | | |
| २. | राज्य आयोग व जिल्हा आयोग यांची कामगिरी :- | | | | |
| (एक) | (क) स्थापनेपासून दाखल झालेली एकूण प्रकरणे | राज्य आयोग | | जिल्हा आयोग | |
| | (ख) निकाली काढलेली प्रकरणे | | | | |
| | (ग) निश्चित केलेल्या विहित कालावधीत निकाली काढलेली प्रकरणे | | | | |
| | (घ) लोक अदालत पध्दतीने निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या | | | | |
| (दोन) | प्रलंबित प्रकरणे (आकडेवारी द्यावी.) | राज्य आयोग | | जिल्हा आयोग | |
| | (क) ३ महिन्यापेक्षा अधिक ते १ वर्षापर्यंत | | | | |
| | (ख) १ वर्षापेक्षा अधिक ते २ वर्षापर्यंत | | | | |
| | (ग) २ वर्षापेक्षा अधिक ते ५ वर्षापर्यंत | | | | |
| | (घ) ५ वर्षापेक्षा अधिक | | | | |
| (तीन) | विहित कालावधीत निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या (आकडेवारी द्यावी) | राज्य आयोग | | जिल्हा आयोग | |
| | (क) १५ मार्च, ०३ नंतर प्राप्त प्रकरणांची संख्या | | | | |
| | (ख) वरील (क) पैकी विहित कालावधीत निकाली | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | काढलेल्या प्रकरणांची संख्या (आकडेवारी व टक्केवारी) | | | |
| ३ | कॉन्फोनेट प्रकल्पाची अंमलबजावणी | | | |
| | संगणक (हार्डवेअर/सॉफ्टवेअर) आहे. | राज्य आयोग | | जिल्हा आयोग (संख्या) |
| (एक) | (क) प्राप्त आहे | होय | नाही | |
| | (ख) स्थापित आहे | होय | नाही | |
| | (ग) कार्यरत आहे. | होय | नाही | |
| (दोन) | (क) प्रकरण संनियंत्रण प्रणाली स्थापित आहे आणि कार्यरत आहे. | होय | नाही | |
| | (ख) चालू असलेल्या प्रकरणांची माहिती भरण्यात येते. | होय | नाही | |
| | (ग) वादसूची आणि निकालपत्र संकेतस्थळावर उपलब्ध केले जाते. | होय | नाही | |
| ४ | प्रशिक्षण :- | | | |
| (एक) | भारतीय लोकप्रशासन संस्थेमध्ये अध्यक्ष/सदस्यांचे प्रशिक्षण | नियोजन आराखड्यानुसार त्या वर्षात प्रशिक्षित करावयाचे प्रस्तावित | आतापर्यंत प्रशिक्षित | अहवालाच्या तिमाही कालावधी मध्ये प्रशिक्षित |
| (दोन) | बीआयएस प्रशिक्षण संस्थेमध्ये राज्य/जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (क) | कॉन्फोनेट अंतर्गत प्रशिक्षण | | | |
| | (अ) अध्यक्ष व सदस्य | | | |
| | (ब) इतर कर्मचारीवर्ग | | | |
| (ड) | (इतर कोणतेही) प्रशिक्षण | | | |
| ५ | ई-फायलिंग | | | |
| (एक) | ई-फायलिंग प्रणालीद्वारे दाखल ग्राहक तक्रारी<br>(आतापर्यंत आणि अहवाल कालावधीतील महिना निहाय ) | | | |
| ६ | अहवालाच्या कालावधीमध्ये आयोगास प्राप्त झालेली शुल्काची रक्कम | | | |
| (एक) | अहवालाच्या कालावधीमध्ये राज्य आयोगास प्राप्त झालेली शुल्काची रक्कम | | | |
| (दोन) | अहवालाच्या कालावधीमध्ये जिल्हा आयोगास प्राप्त झालेली शुल्काची रक्कम | | | |
| ७ | अहवाल कालावधीमध्ये ग्राहक कल्याण निधी/राज्य शासनाच्या लेखाशीर्षामध्ये जमा केलेली रक्कम | | | |
| ८ | ग्राहक आयोगासाठी विकसित व समर्पित असलेले संकेतस्थळ आहे का? (होय/नाही)<br>संकेतस्थळ वेळोवेळी अद्ययावत केले जाते काय? (होय/नाही)<br>नसल्यास त्याबाबतची कारणे. | | | |
| ९ | मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये वस्तूंचे नमुने पाठविले गेले, अशा प्रकरणांची संख्या<br>(अहवाल कालावधीतील महिना निहाय) | | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय वाघमारे,**
शासनाचे सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th February 2022.

*NOTIFICATION*

CONSUMER PROTECTION ACT, 2019.

No. Grasan-2020/CR.53/CP-4.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (j), (k), (o) and (q) of sub-section (*2*) of section 102 of the Consumer Protection Act, 2019 (35 of 2019) and in supersession of the Consumer Protection (Appointment, Salary, Allowances and Conditions of Service of President and Members of State Commission and District Forum) Rules, 2019 in so far as they relate to matters covered under these rules, except as respects things done or omitted to be done before such a supersession, the State Government of Maharashtra hereby makes the following rules, namely :—

1. *Short title*— These rules may be called the Maharashtra Consumer Protection (Consumer Disputes Redressal Commissions) Rules, 2022.

2. *Definitions*.— (*1*) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) ' Act ' means the Consumer Protection Act, 2019 (35 of 2019) ;

(*b*) ' Appellant ' means a person who makes an appeal against the order of the District Commission or the State Commission, as the case may be ;

(*c*) ' Authorised Agent ' means a person duly authorised by a party to present any complaint, appeal or reply on its behalf of such party before the State Commission or District Commission, as the case may be ;

(*d*) ' Commission ' means the District Commission or State Commission, as the case may be;

(*e*) ' Consumer Welfare Fund ' means the Consumer Welfare Fund constituted by th State Government under section 57 of the Central Goods and Services Tax Act, 2017 (12 of 2017) ;

(*f*) ' Memorandum ' means any memorandum of appeal filed by the appellant ;

(*g*) ' Nationalised Bank ' means a corresponding new bank specified in the First Schedule of the Banking Companies (Acquisition and Transfer of Undertakings) Act, 1970 (5 of 1970) or a corresponding new bank specified in the First Schedule to the Banking Companies (Acquisition and Transfer of Undertakings) Act, 1980 (40 of 1980) ;

(*h*) ' Opposite Party ' means a person who answers complaint made under the Act ;

(*i*) ' President ' means the President of the State Commission or the District Commission, as the case may be ;

(*j*) ' Respondent ' means the person who answers any memorandum of appeal ;

(*k*) ' Section ' means section of the Act.

(2) The words and expressions used, but not defined in these rules shall have the same meanings respectively assigned to them in the Act.

*3. The office of the District Commission and the State Commission.—(1)* The office of the District Commission shall be located at the headquarter of the respective District ;

(2) The office of the State Commission shall be located at,—

(*a*) Mumbai and the places notified by the State Government under sub-section (*2*) of section 42 of the said Act ;

(*b*) regional benches at Aurangabad and Nagpur.

4. *Working days and office hours of the District Commission and the State Commission*— The working days and office hours of the District Commission and the State Commission shall be the same as that of the State Government.

5. *Seal and emblem.*— The official seal and emblem of the District Commission and the State Commission shall be such as the State Government may specify.

6. *Sitting of the Commission.*— The President of the Commission shall convene sittings of the Commissions as and when necessary.

7. *Procedure for filing and hearing of consumer complaints before District Commission and State Commission.*— (1) Language of the Commission —The complaint may be filed by the complainant either in Marathi or Hindi or English language but the language of the District Commission shall be Marathi and the language of the State Commission shall be English.

*Explanation.*— For the purpose of this sub-rule language includes language of hearings and orders.

(2) A complaint shall be presented to the Commission by the complainant in person or by his authorised agent, or be sent by a registered post, addressed to that Commission, in quadruplicate, containing the following particulars, namely :—

(*a*) the name, description and the address of the complainant ;

(*b*) the name, description and address of the opposite party or parties, as the case may be, so far as they can be ascertained ;

(*c*) the facts relating to the complaint and when and where it arose ;

(*d*) documents in support of the allegations contained in the complaint ;

(*e*) the relief which the complainant claims.

(3) Every complaint presented under sub-rule (*2*) shall be accompanied by such fee as specified in rule 9.

(4) The Commission, while disposing of any Complaint before it, shall follow the procedure and conditions provided under section 37 and 38, with such modification as may be considered necessary by it.

(5) The Respondent or his authorised agent give his reply and documents in quadruplicate.

(6) On the date of hearing or any other date to which hearing may be adjourned, the parties or their authorised agents shall appear before the Commission, and where —

(*a*) the complainant or his authorised agent fails to appear, the Commission may in its discretion either dismiss the complaint for default or decide it on merits ; or

(*b*) the Respondent or his authorised agent fails to appear, the Commission may decide the complaint *ex-parte* on the merits of the case.

(7) The District Commission or the State Commission, as the case may be, may, on such terms as it deems fit and at any stage of the proceedings, adjourn the hearing of the complaint, but the complaint shall be decided as far as possible within a period of, —

(*a*) three months from the date of notice received by opposite party where complaint does not require analysis or testing of commodities; and

(*b*) five months from the date of notice received by Respondent where complaint requires analysis or testing.

(8) In the event of a complaint being disposed of after the period specified in sub- rule (7), the Commission, shall record in writing, the reasons for the delay.

(9) If after conducting the proceedings, the Commission, is satisfied with the allegations contained in the complaint, it shall issue orders to the opposite party or parties, as the case may be, directing him or them to take one or more of the actions mentioned in sub-section (*1*) of section 39.

(10) The Commission, shall also have the power to direct that any order passed by it, where no appeal has been preferred under section 41 and 51 respectively be published on its website or through any other media and no legal proceedings shall lie against the Commission or any media for such publication.

*8. Manner of filing complaints electronically.*— The electronic filing of complaints in the Commission shall be effective from such date and for such category of cases as may be notified by the President of the National Commission from time to time.

*9. Fee for making complaints.*— (1) Every complaint filed under sub-section (*1*) of section 35 or sub-clause (i) and (ii) of clause (*a*) of sub-section (*1*) of section 47 shall be accompanied by a fee, as prescribed by the Central Government under sub¬section (*2*) of section 35 of the said Act which is as specified in the table given below, in the form of crossed Demand Draft drawn on a Nationalised Bank or through a crossed Indian Postal Order in favour of President of the District Commission or the Registrar of the State Commission, as the case may be, and payable at the respective place where the District Commission or State Commission is situated or through electronic mode as per arrangement made by the Commission concerned.

(2) The Commission, shall credit the amount of the fee received by it under sub-rule (*1*) into the appropriate account of State Government.

**Table**

| Sr. No. (1) | Value of goods or services paid as consideration (2) | Amount of Fees (in rupees) (3) |
|---|---|---|
| District Commission | | |
| 1 | Upto Rupees five lakh | Nil |
| 2 | Above Rupees five lakh and upto Rupees ten lakh. | Rs.200 |
| 3 | Above Rupees ten lakh and upto Rupees twenty lakhs | Rs 400 |
| 4 | Above Rupees twenty lakh and upto Rupees fifty lakh | Rs.l000 |
| 5 | Above Rupees fifty lakh and upto Rupees one crore | Rs.2000 |
| State Commission | | |
| 6 | Above Rupees one crore and upto Rupees two crore | Rs.2500 |
| 7 | Above Rupees two crore and upto Rupees four crore | Rs.3000 |
| 8 | Above Rupees four crore and upto Rupees six crore | Rs.4000 |
| 9 | iAbove Rupees six crore and upto Rupees eight crore | Rs.5000 |
| 10 | Above Rupees eight crore and upto Rupees ten crore | Rs.6000 |

*10. Manner of authentication of goods by the Commission for analysis and testing—*

(1) The Commission may direct the complainant to provide one or more than one sample of the goods in clean containers with stopper properly fixed on them for the purposes of testing or analysis.

(2) On receiving the samples of such goods, the Commission shall seal it and fix labels on the containers carrying the following information, namely :—

(*a*) the name and address of the appropriate laboratory to whom sample shall be sent for analysis and test ;

(*b*) the name and address of the Commission ;

(*c*) the case number ; and

(*d*) the official seal of the Commission.

(3) The sealed sample shall be sent to the recognised laboratory by the Commission.

(4) The recognized laboratory shall, after receiving sealed sample and examining it, shall forward its report to the Commission within forty-five days or within such extended time as may be granted by the Commission, specifying the nature of the defect and date of submission of report.

11. *Procedure for filing and hearing of appeal before State Commission.*— (1) A Memorandum shall be presented by the appellant or his authorised agent to the State Commission in person or sent by registered post with acknowledgment due addressed to the State Commission.

(2) Every Memorandum filed under sub-rule (*1*) shall preferably be typed, or be in legible handwriting, and shall set forth concisely under distinct heads, the grounds of appeal without any argument or narrative and such grounds shall be numbered consecutively.

(3) Each Memorandum shall be accompanied by the certified copy of the order of the District Commission appealed against and such of the documents, as may be required to support grounds of appeal mentioned in the Memorandum.

(4) When the appeal is presented after the expiry of the period of limitation as specified in the section 41 of the Act the Memorandum shall be accompanied by, an application supported by an affidavit setting forth the facts on which Appellant relies upon to satisfy the State Commission that he has sufficient cause for not preferring the appeal within the period of limitation.

(5) The Appellant shall submit four copies of the Memorandum to the State Commission for official purposes.

(6) On the date of hearing or any other day to which hearing may be adjourned, the parties or their authorised agents shall appear before the State Commission, and where, —

(*a*) the appellant or his authorised agent fails to appear the State Commission may, in its discretion, either dismiss the appeal or decide *ex-parte* on the merits of the case.

(*b*) the respondent or his authorised agent fails to appear, the State Commission shall proceed *ex-parte* and decide the appeal on merits of the case.

(7) The Appellant shall not, except by the leave of the State Commission, urge or be heard in support of any ground of appeal not set forth in the Memorandum, but the State Commission, in deciding the appeal, need not confine itself to the grounds of appeal set forth in the Memorandum or taken by leave of the State Commission under this rule:

Provided that, the State Commission shall not rest its decision on any other grounds unless the party who may be affected thereby, has been given, at least the opportunity of being heard by the State Commission.

(8) No adjournment shall ordinarily be granted at any stage by the State Commission, unless sufficient cause is shown and the reason for grant of adjournment have been recorded in writing by the State Commission:

Provided that, the State Commission shall not ordinarily grant more than one adjournment and shall ensure as far as possible, that the appeal is decided of within ninety days from the date of admission :

Provided further that, in the event of an appeal being disposed of after the period specified in the first proviso, the State Commission shall record in writing the reasons for the same at the time of disposal of the said appeal.

(9) The order of the State Commission on appeal shall be signed and dated by the Members of the State Commission Constituting the Bench and shall be communicated to the parties concerned free of cost.

12. *Manner of depositing amount in appeals before State Commission*— Where an appeal is filed under section 41, the amount to be deposited by the Appellant as provided in the second proviso to the said section shall be remitted in the form of a crossed Demand Draft drawn on a nationalised bank in favour of the Registrar, State Commission, Mumbai payable at Mumbai and in favour of Registrar of Regional Bench of State Commission at Aurangabad and Nagpur payable at Aurangabad and Nagpur, respectively.

13. *Additional powers of the Commission.*— (1) The Commission, shall have power to require any person,—

(*a*) to produce before it such book, account, documents or commodities which is in the custody or under the control of such person, if it is required for the purposes of any proceedings before it, and allow the same to be examined and kept by such officer of the Commission, as it may specify in this behalf;

(*b*) to furnish to the officer specified in clause (*a*), such information as may be required for the purposes of any proceeding before it.

(2) Where during any proceeding under the Act, the Commission, has any ground to believe that any book, paper, commodity or document which may be required to be produced in such proceedings, are being or may be, destroyed, mutilated, altered, falsified or secreted, it may, by written order, authorise any officer to exercise the power of entry and search of any premises, and seizure any book, paper, document or commodities as may be required for the purposes of such a proceeding:

Provided that, such seizure shall be communicated to the State Commission or the District Commission, as the case may be, as soon as it is made or within a period not exceeding seventy-two hours of making such seizure after specifying the reasons in writing for making such seizure.

(3) The State Commission or the District Commission, as the case may be, on examination of such seized documents or commodities, may order the retention thereof or may return it to the party concerned.

14. *Credit of amount payable for loss or injury suffered by consumer who are not identifiable conveniently.*—(1) Where an order is passed under clause (*k*) of sub¬section (1) of Section 39 by the District Commission or the State Commission, in exercise of its powers vested under sub-section (*1*) of Section 49, directing the opposite party to pay such amount as may be determined by it on account of loss or injury suffered by a large number of consumers, who are not identifiable conveniently, such sum shall be credited by the Commission in the Consumer Welfare Fund established by the State Government.

(2) The amount credited to the Consumer Welfare Fund of the State Government under sub-rule (*1*) shall be utilised in accordance with rules framed under the Maharashtra Goods and Services Tax Act, 2017 (Mah.XLIII of 2017).

15. *Furnishing of information by State Commission.*— The State Commission shall furnish information to the State Government on quarterly basis of financial year in the form as specified in Schedule-I appended to these rules.

SCHEDULE-I

*(see* rule 15*)*

Present position of implementation

(Quarterly Performance Report)

Working of Consumer Commissions/Consumer Protection Measures

Name of State :

<table>
<tr><td colspan="6">1.Establishment of State Commission and District Commissions :-</td></tr>
<tr><td>(I)</td><td colspan="2">Total number of Districts in the State</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>(II)</td><td colspan="2">Number of District Commissions in the State</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">(a) Total Setup :</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">(b) Functional :</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">(c) Non Functional :</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">(d) Name of District where District Commission yet to setup :</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">(e) Number of District where District Commission yet be setup :</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td></td><td>(f) Number of District where more than one District Commission has been setup :</td><td>District Name</td><td colspan="3">Number of District Commission</td></tr>
<tr><td>(III)</td><td>Whether State Commission is functional</td><td></td><td>YES</td><td colspan="2">NO</td></tr>
<tr><td>(IV)</td><td>Strength and vacancies</td><td colspan="2">State Commission</td><td colspan="2">District Commission (Districtwise to be enclosed separately)</td></tr>
<tr><td></td><td></td><td>Sanctioned strength</td><td>Vacancies</td><td>Sanctioned strength</td><td>Vacancies</td></tr>
<tr><td></td><td>(a) President</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>(b) Members</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td>(c) Reasons for vacancies and action taken to fill up the same. (to be enclosed separately)</td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>2.</td><td colspan="5">Performance of State Commission and District Commission:-</td></tr>
<tr><td>(I)</td><td>(a) Total cases filed since inception</td><td colspan="2">State Commission</td><td colspan="2">District Commission</td></tr>
<tr><td></td><td>(b) Cases disposed of</td><td colspan="2"></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td></td><td>(c) Cases disposed of within prescribed time norms</td><td colspan="2"></td><td colspan="2"></td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (d) Number of cases disposed of by Lok Adalat method | | | |
| (II) | Detailed Break up of cases pending (give number of cases) | State Commission | | District Commission |
| | (a) Over 3 months up to 1 year | | | |
| | (b) Over 1 year up to 2 years | | | |
| | (c) Over 2 years upto 5 years | | | |
| | (d) Over 5 years | | | |
| (III) | Cases disposed of within time norms (give number) | State Commission | | District Commission |
| | (a) cases received after 15 March'03 | | | |
| | (b) cases disposed of within time norms out of (a) above (Number and %) | | | |
| 3 | Implementation of Confonet Project:- | | | |
| | Computer Hardware/ Software has | State Commission | | District Commission (Numbers) |
| (I) | (a) been received | Yes | No | |
| | (b) been installed | Yes | No | |
| | (c) been functional | Yes | No | |
| (II) | (a) Is Case Monitoring System Installed and Operational | Yes | No | |
| | (b) Has the live case data been entered | Yes | No | |
| | (c) Whether cause list and judgement being posted on the website | Yes | No | |
| 4 | Training:- | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (a) | Training of Members/President in Indian Institute of Public Administration | To be trained in the year as per training plan | Trained so far | During the quarter |
| (b) | Training of State/District level officers in BIS Training Institute | | | |
| (C) | Training under Confonet | | | |
| | *(a)* President and members | | | |
| | *(b)* Other Staff | | | |
| (d) | Any other Training | | | |
| 5 | E-Filing | | | |
| (I) | Number of Consumer Complaints filed through E-filing facility (till date and monthwise during reported period) | | | |
| 6 | Amount received as a fees to the Commissions during the quarter | | | |
| (I) | Amount received as a fees to State Commissions | | | |
| (II) | Amount received as a fees to District Commissions | | | |
| 7 | Amount deposited during the quarter to- | | | |
| | The Consumer Welfare Fund/State Government Budget head | | | |
| 8 | Is there any well developed and dedicated web site of Consumer Commission available? (YES/NO)<br>Is it updated from time to time (YES/NO)<br>if not, please give reasons for same | | | |
| 9 | The number of cases in which sample of the goods sent to recognised labaratory ? (monthwise during reported period) | | | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY WAGHMARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.